शेठ टी.जे. एज्युकेशन सोसायटीचे

शेठ एन्.के.टी.टी. वाणिज्य महाविद्यालय व शेठ जे.टी.टी. कला महाविद्यालय, ठाणे.

दिनांक : १४ ऑक्टोबर, २०१९

## सूचना

## आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती

सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की राज्य सरकार पुरस्कृत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरिता **'राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना'** ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. ही योजना बिगर आरक्षित प्रवर्ग (General Category) तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातून (SEBC Category) प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना लागू राहील.

**किमान पात्रता व अटी :**

१) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२) अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. आठ लाख व त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.
३) शासन निर्णयानुसार पहिली दोन मुले या योजनेसाठी पात्र आहेत.
४) अर्जदाराने इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
५) अर्जदार विद्यार्थ्यास प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परिक्षा देणे आवश्यक राहील.
६) मागील वर्षी सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी अर्ज करु शकतात.

**अर्ज करण्याची पध्दत :**

विद्यार्थ्यांनी वरील योजनेचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या **https://mahadbtmahait.gov.in** पोर्टलवर देण्यात आलेल्या **User Manual / FAQ** चा वापर करुन व पोर्टलवर दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करुन **अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेपर्यन्त न थांबता** संपूर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घ्यावेत.

**https://mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर जाऊन पहिल्यांदाच अर्ज भरत असलेल्या विद्यार्थ्यांनी **'नवीन अर्जदार नोंदणी' (New Applicant Registration)** वर क्लिक करुन माहिती भरल्यानंतर आपणांस आपला युजर आयडी मिळेल. त्याची आपल्याकडे नोंद करुन ठेवावी. त्यानंतर पुन्हा लॉगइन करुन आपणांस मिळालेला युजर आयडी व आपण स्वत: ठरविलेला पासवर्ड टाकून अर्ज व्यवस्थित भरावा. तसेच गतवर्षी अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांनी गतवर्षी प्राप्त युजर आयडी वापरुन अर्ज भरावा. अर्ज भरल्यानंतर सदर अर्जाची प्रिंट आऊट काढून खाली नमूद केलेल्या कागदपत्रांसहित पुढील कार्यवाहीकरिता महाविद्यालयीन कार्यालयात जमा करावा. अर्ज भरण्याची **वाढीव अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर, २०१९** आहे.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाचा दाखला सत्यप्रत **(SEBC Caste Certificate)**
२) तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला **(Income Certificate from competent Govt. Authority)**
३) महाराष्ट्र राज्याचा अधिवास दाखला **(Domicile Certificate)**
४) आधार कार्ड सत्यप्रत **(Aadhar Card)**
५) महाविद्यालयीन फी भरलेली पावती, रेशन कार्ड **(College Fee Receipt, Ration Card)**
६) दहावी, बारावी व गतवर्षाची गुणपत्रिकेची सत्यप्रत **(SSC, HSC Marksheet)**
७) बारावी महाविद्यालय सोडल्याचा दाखला सत्यप्रत **(HSC Leaving Certificate)**
८) राष्ट्रीयकृत बँकेमध्ये बचत खाते असलेल्या पासबुकची झेरॉक्स **(Bank Account Details)**
९) दहावीपासून आत्तापर्यन्त शैक्षणिक कारकिर्दीमध्ये खंड पडला असल्यास गॅप सर्टिफिकेट **(Gap Certificate)**
१०) दोन मुलांचे कुटुंब घोषणापत्र

टीप : 1) विद्यार्थ्यांना उपरोक्त फॉर्म भरण्याबाबत कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत **श्री. डी.एन्. पवार** यांच्याशी संपर्क साधावा.

2) **B.M.S./B.Sc.(IT)** या अभ्यासक्रमांसाठी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गांना मिळणारी **शिष्यवृत्ती शासनातर्फे देण्यात येत नाही** याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

I/C PRINCIPAL
SHETH T. J. EDUCATION SOCIETY'S
SHETH N.K.T.T. COLLEGE OF COMMERCE &
SHETH J.T.T. COLLEGE OF ARTS, THANE (W).